# <u>प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.</u>

<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण</u>

**<u>सं. फौ. ख. क. ५३७/२०१५</u>**
**<u>निशाणी : २</u>**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याची तारीख | : | २१/०२/२०१५. |
| २. फिर्याद दाखल तारीख | : | २१/०२/२०१५. |
| ३. फिर्यादीचे नांव | : | श्री. कुलदीप पाटील,<br>आर.पी.एफ. लोणी. |
| ४. आरोपीचे नांव | : | प्रदीप बंडु चव्हाण<br>वय २७ वर्षे, रा. शिरुर, पुणे. |
| ५. गुन्हा कलम | : | कलम १५६ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९ |

**<u>अपराधाचे विवरण –</u>**

दिनांक २१/०२/२०१५ रोजी सकाळी १०.४० वाजता तुम्ही गाडी क. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करीत असतांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १५६ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**–<u>आरोपीचे प्रतिकथन</u> –**

प्र. १ : तुम्हाला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हाला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

आरोपीची सही........................................

**समक्ष**

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : २१/०२/२०१५.**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १</u>**

<u>मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :</u>

माझे नांव : एस. ए. आदमाने.

वय : ४० वर्षे, व्यवसाय : उप निरिक्षक, आर.पी.एफ. लोणी.

राहण्याचे ठिकाण : लोणी.

**<u>सरकारी वकील गैरहजर, सरतपास फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार स्वत:</u>**

१. दिनांक २१/०२/२०१५ रोजी फिर्यादी श्री. कुलदीप पाटील, आर.पी.एफ. लोणी यांनी फिर्याद दिली की, त्यांची डयुटी लोणी स्टेशनवर होती. त्यावेळेस आरोपी हा सकाळी १०.४० वाजता गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करीत असतांना त्यांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने त्यास पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. मी फिर्यादीची फिर्याद लिहून घेतली असून त्यावर फिर्यादीची व माझी सही आहे. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. आरोपी हा गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करतांना मिळून आला म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १५६ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे स्वत:</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास केला हे तुम्ही खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

३. फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय,दौंड.**

**दिनांक : २१/०२/२०१५**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.</u>**

प्रश्न क्र. १ : फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर : होय

प्रश्न क्र. २ : एस. ए. आदमाने (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २१/०२/२०१५ रोजी सकाळी १०.४० वाजता तुम्ही गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करीत असतांना मिळून आलात. याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे?
उत्तर : हे खोटे आहे.

प्रश्न क्र. ३ : सदर साक्षीदार तुमचेविरूध्द का साक्ष देतात?
उत्तर : मला माहित नाही.

प्रश्न क्र. ४ : तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ५ : तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ६ : सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय?
उत्तर : नाही.

**समक्ष,**

आरोपीची सही.........................................

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : २१/०२/२०१५.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील तपासणी माझेसमक्ष ऐकणेत व घेणेत आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : २१/०२/२०१५.**

— मौखिक न्यायनिर्णय —
( पारित दिनांक २१ फेब्रुवारी २०१५. )

१) आरोपीवर कलम १५६ रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवणेत आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक २१/०२/२०१५ रोजी आरोपी हा सकाळी १०.४० वाजता गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करतांना फिर्यादी श्री. कुलदीप पाटील, आर.पी.एफ. लोणी यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण (नि.क्र.२) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १.दिनांक २१/०२/२०१५ रोजी सकाळी १०.४० वाजता आरोपी हा गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करीत असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २.आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

***का र ण मि मां सा***

५) **मुद्दा क्रमांक १:—**

श्री. एस. ए. आदमाने (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २१/०२/२०१५ रोजी सकाळी १०.४० वाजता गाडी क्र. ५१३२५ मध्ये पायरीवर बसून प्रवास करीत असतांना फिर्यादी श्री. कुलदीप पाटील यांना मिळून आला व त्यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी ३ नोंदवून घेतली. तसेच सदर साक्षीदाराने साक्षीमध्ये पुढे असे सांगितले की, त्यांच्या चौकशीमध्ये आरोपी हा ५१३२५ डाउनमध्ये पायरीवर बसून प्रवास करीत असतांना मिळून आल्याचे निष्पन्न झाले म्हणून त्यांनी आरोपीविरुद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल केली. सदरची बाब आरोपीने नाकारली आहे. परंतु तो गाडी क्र. ५१३२५ डाउनमध्ये प्रवास करीत होता ही बाब त्याने नाकारलेली नाही. तसेच आरोपीने तो कोणत्या बोगीमध्ये अथवा कोणत्या बर्थवर प्रवास करीत होता याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. फक्त

उलटतपासामध्ये साक्षीदाराची साक्ष नाकारणे यावरुन त्याने ५१३२५ डाउनमध्ये पायरीवर बसून प्रवास न केल्याचे गृहीत धरता येणार नाही. तसेच चौकशी अधिका—यास आरोपीस खोटया प्रकरणात गुंतविणेचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. यावरुन चौकशी अधिका—याची साक्ष विश्वास निर्माण करते. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने गाडी क्र. ५१३२५ डाउनमध्ये पायरीवर बसून प्रवास केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

६) **<u>मुद्दा क्रमांक २:—</u>**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिद्व केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिद्व करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १५६ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविण्यात येत असून त्याने सदर अपराधासाठी रुपये २००/— (एकूण दोनशे रुपये फक्त) दंड भरावा. दंड भरणेस कसूर केलेस दोन दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

**उरुळी येथील दौरा**
**दिनांक: २१/०२/२०१५.**

**( एम. आर. देशपांडे )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : S.G.Datrange,
Court's Name : M.R.Deshpande, J.M.F.C.Railway Court, Daund.
Date : 21.02.2015.
Judgment signed by presiding officer on : 21.02.2015.
Judgment uploaded on :" 23.02.2015